IJETIR
ISSN (Online) 2583-0554
International Journal of Emerging Technologies and Innovative Research (IJETIR)
Impact Factor: 5.731
Volume 4, Issue 3, March 2024

# ग्रामीण भागातील श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचा आढावा

**अनंत रावसाहेब आवळे**

**प्राध्यापक, ग्रामीण विकास विभाग प्रमुख,**

**गोखले एज्युकेशन सोसायटीचे, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, जव्हार, ता.जव्हार,जिल्हा: पालघर.**

**गोषवारा:**

ग्रामीण भागाच्या लोकांच्या आर्थिक जीवनाचा सर्वात महत्त्वाचा कणा म्हणजे शेती व शेतमजुरी आहे व शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याकारणाने. पावसाळ्याच्या कालावधीमध्येच रोजगार उपलब्ध होतो. उर्वरित काळामध्ये त्यांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. कारण संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था ही श्रमिकांच्या रोजगारावर अवलंबून असते.

**प्रस्तावना :**

भारतातील ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे, कारण भारतीय अर्थव्यवस्था ही आजही मोठ्या प्रमाणात शेती आणि शेतीतील इतर उद्योगांवर अवलंबून आहे. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणे शक्य नाही. त्याचबरोबर भारतातील लोकसंख्या वाढीचा दर, नैसर्गिक दुष्काळ, कुपोषण , भूकबळी, बेरोजगारी, वैद्यकीय सुविधांचा अभाव, शैक्षणिक परिस्थिती, यासारखे अनेक प्रश्न ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून होणारे रोगासाठी शहरी भागात होणारे स्थलांतर कमी होईल. व ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होईल.

**संशोधनाची गृहीतके:**

१) ग्रामीण भागातील रोजगाराची परिस्थिती.

२) रोजगार विषयक कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी.

३) ग्रामीण भागातील क्षमतेचा अभाव.

४) ग्रामीण भागातील संघटन शक्तीचा हा अभाव.

**संशोधनाचे महत्त्व:**

भारत हा कृषिप्रधान देश असून खरा भारत हा ग्रामीण भागातच राहतो ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. परंतु शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्याकारणाने. ग्रामीण भागातील श्रमिकांची आर्थिक स्थिती या अत्यंत दयनीय स्वरूपाचे आहे. त्याची कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचे विशधीकरण:**

भारतातील ग्रामीण भागाच्या श्रमीकांचा आर्थिक स्थितीचाअभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून खालील घटकांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**१) बेरोजगारी:**

ग्रामीण भागातील व्यक्तीची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही त्याला अनेक कारणामुळे काम मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी आपणास दिसून येते. याचा परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होत असतो.

**२) शेतमजूर व ग्रामीण बेकारी:**

ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेती असला तरी शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्याकारणाने ग्रामीण भागातील सर्वांनाच शेतीमध्ये रोजगार उपलब्ध होत नाही. ही ग्रामीण भागातील वास्तवता आहे व ती नाकारता येत नाही त्यामुळे हंगामानंतर रोजगाराच्या शोधात ग्रामीण भागातून शहरी भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत असते.

३) शेतमजुरांची वाढती संख्या:

नुकत्याच केलेल्या पाहणीनुसार ग्रामीण भागात शेतमजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे शेतमजुरांच्या संख्येत वाढीचे विविध कारणे आहेत. त्यामध्ये शेतीवर लोकसंख्येचा भार धार्मिक कार्य आणि उत्पादक कार्य या अनेक कारणामुळे शेतकरी वर्ग आपली परिस्थिती नसताना सुद्धा गावातील सावकाराकडून मोठ्या व्याजदरातून पैसे काढत असतो व त्यामुळे तो कर्जबाजारी होत आहे.

**४) शेती क्षेत्रातून श्रमाचा पुरवठा:**

ग्रामीण भागातील श्रमिकांना मोठ्या प्रमाणात शेती व्यवसायातून रोजगार उपलब्ध होत असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीवर लोकसंख्येचा दाब वाढत चाललेला आहे त्यामुळे शेती क्षेत्रात अर्ध बेकारी प्रछन्न बेकारी बेकारी यासारखे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे शेती क्षेत्रातील ही जादा श्रमशक्ती मोठ्या प्रमाणात शहरी भागाकडे स्थलांतर झालेले आहे.

**५) निरक्षरता:**

ग्रामीण भागातील श्रमिकांचा विचार करता मोठ्या प्रमाणात आपणास निरक्षरता दिसून येते. श्रम करून आलेले पैसे हे कसे टिकवावे व त्याचा आपल्या कुटुंबासाठी कसा वापर करावा याविषयी त्यांना फारसे ज्ञान नसते .त्यामुळे येणारा पैसा हा लवकरात लवकर खर्च करून आहे त्या परिस्थितीला नेहमी सामोरे जातात त्यामुळे नेहमी त्यांना आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागते.

**६) संघटन शक्तीचा अभाव:**

ग्रामीण भागातील लोकांमध्ये निरक्षतेमुळे संघटनेचे महत्त्व त्यांना समजत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील मोठे सावकार व श्रम पुरवठा करणारे जमीनदार हे या ग्रामीण भागातील श्रमीकांचे आर्थिक शोषण करत असतात. त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला देत नाहीत.

त्या कारणामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांची आर्थिक स्थिती फार हालाखीची असते. व ते कायमस्वरूपी कर्जबाजारामध्येच अडकलेले असतात.

**सारांश:**

ग्रामीण भागातील श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना असे निदर्शनास येते की. ग्रामीण भागातील शेतमजुरांना श्रमाची गरज असताना सुद्धा त्यांना हंगामानंतर मोठ्या प्रमाणात स्थलांतर करावे लागते. त्यामुळे आपले घरदार सोडून त्यांना आपल्या उदरनिर्वासाठी शहरी भागात मिळेल ते काम करावे लागते. ग्रामीण भागातील श्रमिकांचीआर्थिक स्थितीचा अध्ययन करताना निरक्षरता. शेतमजुरांची वाढती लोकसंख्या. संघटन शक्तीचा अभाव. असे अनेक कारणे आहेत की ज्यामुळे ग्रामीण भागातील श्रमशक्ती व श्रमिकांची आर्थिक स्थिती या अत्यंत गुंतागुंतीची दिसून येते.

IJETIR
ISSN (Online) 2583-0554
International Journal of Emerging Technologies and Innovative Research (IJETIR)
Impact Factor: 5.731
Volume 4, Issue 3, March 2024

**संदर्भ ग्रंथ:**

१)'योजना मासिक. पब्लिकेशन प्रकाश – २०१८.

२) म्हात्रे अनिल-"महाराष्ट्र संदर्भ पुस्तिका"-समर्थ प्रकाशन मुंबई ४०० ००२

३) मुंडे पांडुरंग पंढरीनाथ'-महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा चिकित्सक अभ्यास:" पीएचडी शोध निबंध.